# MARATHI (LL)

## SOLUTION : PRACTICE ACTIVITY SHEET 3

**प्र. 1. (अ)**

**(1)**

| कथेचे प्रकार – |
|---|
| (१) परीकथा |
| (२) बोधकथा |
| (३) विज्ञानकथा |
| (४) ऐतिहासिक कथा |

**(2)** (i) मूळ कथा दर्जेदार असल्याशिवाय कलाकृती उत्तम होऊ शकत नाही.

(ii) झोपेत सुश्रुतला पुस्तकाच्या वेशातील मुले भेटायला आली.

**(3)** पुस्तकांसारखा मित्र जगात कुणी नाही. पुस्तकांशी मैत्री करणे म्हणजे आपले जीवन समृद्ध करणे. पुस्तके निःस्वार्थी असतात. ती आपल्याकडून कोणतीही अपेक्षा करीत नाहीत. जेव्हा हवी असतील, तेव्हा ती वाचनासाठी मिळतात. त्यांना आपण कुठेही आपल्याबरोबर नेऊ शकतो. ती कोणतीही तक्रार करीत नाहीत किंवा हट्ट धरत नाहीत. पुस्तकांमुळे आपल्याला ज्ञान व माहिती मिळते. पुस्तकांमुळे आपले मनोरंजन होते. पुस्तके आपल्याला चांगली शिकवण देतात. देशोदेशीची सफर घडवून आणतात. पुस्तकांमुळे आपल्या जीवनात आनंद येतो. पुस्तकांमुळे आपल्यावर चांगले संस्कार होऊन आपले जीवन समृद्ध व सुखकर होते. म्हणून पुस्तकांशी घट्ट व अतूट मैत्री करावी.

**प्र. 1. (आ)**

**(1)** (i) डॉ. माशेलकर यांना लहानपणीच 'माशेल' सोडावे लागले; कारण त्यांच्या वयाच्या सहाव्या वर्षी माशेलकर यांचे वडील वारले आणि उदरनिर्वाहासाठी त्यांना माशेल सोडावे लागले.

(ii) 'शाळेत कसा जाऊ?' असा प्रश्न डॉ. माशेलकरांना पडला; कारण त्यांना शाळेची कोणतीच फी भरणे शक्य नव्हते.

**(2)**

| डॉ. माशेलकर यांच्या माशेल गावातील आठवणी | |
|---|---|
| मैदानावर खेळल्याच्या | पिंपळ कट्ट्यावर बसून निवांतपणा अनुभवल्याच्या |

**(3)** डॉ. माशेलकर यांनी शालेय शिक्षण फार गरिबीत पूर्ण केले. पायात घालायला चप्पलही नव्हती. वयाच्या बाराव्या वर्षांपर्यंत त्यांना चपलेशिवाय राहावे लागले. वयाच्या सहाव्या वर्षी त्यांचे वडील वारले. त्यामुळे गाव सोडून ते व त्यांची आई खेतवाडीमध्ये लहानशा खोलीत राहिले. आर्थिक परिस्थिती वाईट व दारिद्र्याशी संघर्ष करणारी अल्पशिक्षित आई, अशा परिस्थितीत डॉ. माशेलकर शिक्षणासाठी आसुसलेले होते. आईची जिद्द व शिक्षकांचे मार्गदर्शन या बळावर माशेलकरांनी प्रगती केली. भिंगाच्या साहाय्याने सूर्यकिरणाची शक्ती कागदावर एकत्र केल्यास कागद जळतो. या प्रयोगातून माशेलकरांना एकाग्रतेचा मंत्र मिळाला आणि विज्ञान समजू लागले. संघर्षासाठी आत्मविश्वास बळावला. माशेलकरांना जगण्याचे भान आले. शाळा, शिक्षक व परमप्रिय आई हे त्यांचे 'संस्कार केंद्र' होते.

**प्र. 1. (इ)**

**(1)** **विद्यार्थ्यांची समाजात वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या सवयी –**

- चांगले साहित्य वाचणे
- योग्य ठिकाणी खर्च करणे
- आवश्यक असेल तेवढेच बोलणे
- नेहमीच इतरांच्या मदतीसाठी तत्पर असणे

*(**नोंद :** वरील चार चौकटींतील उत्तरांपैकी कोणतीही दोन उत्तरे योग्य.)*

**(2)** (i) तुम्ही जोपर्यंत मार्गदर्शन मिळवण्यासाठी स्वत:हून पुढाकार घेत नाही, तोपर्यंत तुम्हांला कोणाचेही मार्गदर्शन मिळणार नाही.

(ii) चांगल्या सवयी केवळ ध्येय गाठून थांबत नाहीत, तर त्या संपूर्ण मानवी गुण वृद्धिंगत करण्यास मदत करतात.

**प्र. 2. (अ)**

**(1)** (i) पाण्याच्या तुषारांचा रंग – फेनधवल

(ii) अनोखी तुष्टी मिळण्याचे ठिकाण – आभाळाच्या छत्राखाली

**(2)** (i) मातीमध्ये जे हात राबती, तयांस देऊ पुष्टी

(ii) यंत्राच्या संगती काय मिळणार आहे?

**(3)** (i) पुष्टी – दुजोरा

(ii) वृष्टी – वर्षाव

(iii) मन – चित्त

(iv) हात – हस्त/कर.

**(4)** पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन कसे करावे हे कवितेतून सांगताना कवयित्री म्हणतात – रंग उद्याचे व रंग मजेचे पाहण्यासाठी या सृष्टीला जिवाभावाने जपायला हवी. संगणक हा अन्नधान्य देत नाही. त्यामुळे मातीमध्ये राबणाऱ्या शेतकऱ्याला पाठबळ देऊन काळ्या आईची सेवा करायला हवी. डोंगरावर बिया उधळून द्याव्यात. त्यातून देशी झाडे उगवतील. दाट राने फोफावतील. त्यामुळे पावसाचा वर्षाव होऊन धरती हिरवीगार होईल. पृथ्वीला दुष्काळापासून वाचवण्यासाठी झाडे लावायला हवीत. निसर्गाचे सौंदर्य टिकवायला हवे. मातीशी असलेली आपुलकी तोडू नये. पर्यावरणाची जोपासना करणे, हे आपले पहिले कर्तव्य आहे. पृथ्वीला वाचवण्यासाठी खूप प्रयत्न करायला हवेत. तेव्हाच धरतीवरच्या हिरव्या छटा पाहून मानवी मन आनंदित होईल.

**प्र. 2. (आ) कविता –** दोन दिवस

(1) **प्रस्तुत कवितेचे कवी** ⟶ नारायण सुर्वे.

(2) **प्रस्तुत कवितेचा विषय** ⟶ कामगाराच्या आयुष्यातील वास्तव परिस्थितीचे चित्रण.

(3) **प्रस्तुत कवितेतील दोन ओळींचा सरळ अर्थ** ⟶ अनेक वेळा चंद्र उगवला. चांदणे पडले. तारे चमचमले. काही रात्री आनंदमय गेल्या. बाकीचे सर्व आयुष्य 'भाकरीचा चंद्र' शोधण्यात म्हणजे भूक शमवण्यात व पोटापाण्याची चिंता करण्यात नासून गेले.

(4) **प्रस्तुत कवितेतून मिळणारा संदेश** ⟶ जीवन कितीही प्रतिकूल व खडतर असले, तरी स्वकर्तृत्वावर विश्वास ठेवावा. प्रयत्नाने जीवनातील दु:खांवर मात करता येते. जीवन सकारात्मक जगण्याची ताकद ही कविता देते, तसेच मानवी निश्चय व आशावाद हे तत्त्व मनावर बिंबवले जाते.

(5) **कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे** ⟶ थेट शब्दकळेतून कामगारविश्वाचे दाहक चित्रण केल्यामुळे कविता मनाला भिडते. कामगार जीवनाच्या खडतरपणाचा प्रत्यय अनुभवता येतो. कामगार जीवनाविषयी सहृदयता जागृत होते. जीवन समजून घेण्याची ओढ निर्माण होते. अशी प्रगल्भ जाणीव मनात निर्माण करणारी ही कविता आवडली.

**किंवा**

**कविता –** अंकिला मी दास तुझा

(1) **प्रस्तुत कवितेचे कवी** ⟶ संत नामदेव.

(2) **प्रस्तुत कवितेचा विषय** ⟶ देवाला आई मानून, देवरूपी मातेने बाळाचा म्हणजेच आपला सांभाळ मायेने करावा, अशी विनवणी करणारा हा अभंग आहे.

(3) **प्रस्तुत कवितेतील दोन ओळींचा सरळ अर्थ** ⟶ झाडावरून जर पिल्लू अचानक धरतीवर पडले, तर त्याचा जीव वाचवण्यासाठी पक्षिणी स्वत:हून खाली झेप घेते. तसेच भुकेले वासरू पाहून त्याला दूध पाजण्यासाठी गाय हंबरत वासराकडे धावते. तशी आई होऊन माझ्यावर माया करावी, अशी विनवणी संत नामदेव श्रीविठ्ठलांकडे करीत आहेत.

(4) **प्रस्तुत कवितेतून मिळणारा संदेश** ⟶ संत नामदेव देवाला आई मानून, आपला सांभाळ बाळाप्रमाणे करावा असे विनवतात. ज्याप्रमाणे बाळ पूर्णपणे आईवर विसंबून असते, त्याप्रमाणे आपणही देवाचरणी लीन व्हावे; म्हणजे तो आईप्रमाणे आपला सांभाळ करील, असा दृढ विश्वास संत नामदेव या अभंगातून व्यक्त करतात.

(5) **कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे** ⟶ या अभंगात संत नामदेव यांनी श्रीविठ्ठलाला आई संबोधून स्वत:चा सांभाळ करण्याची विनवणी केली आहे. हा अभंग वाचताना मला सतत माझ्या आईची आठवण झाली. आई किती जपते आपल्याला! देवानेही आईप्रमाणे आपल्यावर नित्य माया करावी, हा विचारच मनाला भावला. म्हणूनच मला हा अभंग खूप आवडला.

**प्र. 3.**

**(1)** 'जाता अस्ताला' या कवितेमध्ये सूर्य व पणती ही दोन्हीही प्रतीके तेजाची आहेत. सूर्य हे तेजाचे नैसर्गिक प्रतीक आहे. तर पणती हे मानवनिर्मित प्रतीक आहे. लाखो वर्षे सूर्यगोल हा आकाशात तळपत आहे नि तो या पृथ्वीवरील चराचराला ऊर्जा, प्रकाश व चैतन्य सतत देत आहे. सूर्यप्रकाशामुळे मानवी जीवन फुलले आहे. सूर्याने मानवी तनामनाला कायम उजळत ठेवले आहे. पणती हे सूर्याचे मूल आहे. ते महाप्रचंड तेजाचे छोटेसे रूप आहे. स्वत:च्या क्षमतेनुसार पणतीही अंधार दूर करण्याचे कार्य करीत आहे. सूर्य अस्ताला गेल्यानंतर मानवीजीवन उजळत ठेवण्याचे व्रत पणतीने घेतले आहे. त्यामुळे महातेजोगोलाइतकाच तिचाही त्याग महत्त्वाचा आहे. या दोन्ही प्रतीकांतून 'स्वत: जळत राहून जगाला प्रकाश देण्याचा' संदेश आपणास मिळतो. मनात कायम सेवाभाव ठेवून कार्य करण्याची शिकवण ही कविता देते.

**(2)** बार्कमध्ये लेखक इंजिनियर म्हणून रुजू झाले, तेव्हा त्यांना मेटलायझिंग प्रक्रियेवर काम करायला सांगण्यात आले. त्या प्रसंगातून आपल्याला मेटलायझिंग प्रक्रियेवर काम न होण्याची कारणे कळतात. तिथे सगळी यंत्रसामग्री असली, तरी ती कोणी वापरत नाही. इंजिनियरला वेल्डर व फोरमन लागतात. परंतु आता काहीच मदत मिळणार नाही, असे त्यांना सांगण्यात येते. त्यामुळे कुणाचीही मदत न घेता इंजिनियरला आधी सर्व कामे करायला लागतात. स्वत: सगळी कामे इंजिनियरला आली, तर मग त्याला इतर माणसे हाताखाली मिळतील आणि ते आनंदाने काम करतील. आपल्याला येत नसताना दुसऱ्याला काम सांगणे योग्य नाही. प्रथम आपण काम करायचे मग इतरांना सांगायचे, हे घडत नसल्यामुळे मेटलायझिंग प्रक्रियेवर कामे होत नाहीत.

**(3)** पाणी हे पृथ्वीवरचे अमृत आहे. ते सर्व सृष्टीचे संजीवन आहे. पृथ्वीवरील सजीव-निर्जीव सृष्टीला पाण्याची अत्यंत आवश्यकता असते. पाण्याशिवाय पशु-पक्षी, प्राणी व मानवी जीवन कोमेजून जाईल. निसर्ग हिरवागार करण्याची किमया पाण्यामध्ये आहे. पाण्यामुळे गाई-गुरांना हिरवा चारा मिळतो. तर पाण्यामुळे मानवाचे अन्नधान्य शेतात उगवते. जगातील प्रत्येक घटकाची तहान शमवण्याचे सामर्थ्य पाण्यातच असते. पाणी नसेल तर ही पृथ्वी भकास, ओसाड व वैराण होईल आणि पृथ्वीवरील जीवन नष्ट होईल. म्हणून 'पाणी हेच जीवन' हा मानवी इतिहासाचा मूलमंत्र आहे.

**प्र. 4. (अ)**

**(1)** (1) आज्ञार्थी वाक्य

(2) विधानार्थी वाक्य.

**(2)** (1) उद्गारार्थी वाक्य – किती सुंदर नृत्य करते संस्कृती!

(2) आज्ञार्थी वाक्य – इथे सर्वांनी कडक शिस्तीत राहा.

**(3)** (1) अंगावर काटा येणे – **अर्थ :** भीतीने शहारा येणे.

**वाक्य :** छोट्याशा किड्याला पाहून चिन्मयीच्या <u>अंगावर काटा आला.</u>

(2) गोडी लावणे – **अर्थ :** आवड लावणे.

**वाक्य :** अनिरुद्धने सर्व मुलांना मराठीची <u>गोडी लावली.</u>

(3) मरगळ झटकणे – **अर्थ :** आळस सोडणे.

**वाक्य :** सगळी <u>मरगळ झटकून</u> इशिका अभ्यासाला लागली.

**प्र. 4. (आ)**

**(1)** **(i)** (1) चांगली × [वाईट]

(2) खाजगी × [सार्वजनिक]

**(ii)** (1) अहोरात्र = [रात्रंदिवस]

(2) महिना = [मास]

**(iii)** ठरवलेले व्रत मध्येच सोडणे – व्रतभंग

**(iv)** (1) थोरला – थोरली

(2) विदुषी – विद्वान

**(2)** (1) संस्कृती

(2) क्रीडांगण

(3) व्यक्तिमत्त्व

(4) फेब्रुवारी

**(3)**

| | |
|---|---|
| - | संयोगचिन्ह |
| ; | अर्धविराम |
| — | अपसारण चिन्ह |
| : | अपूर्णविराम |

**प्र. 5. (अ), (आ) व (इ) ...**

**उपयोजित लेखनातील कृतींच्या स्वयं-मूल्यमापनाबाबत...**

उपयोजित लेखनाच्या कृतींमध्ये विद्यार्थ्यांनी उत्तर लिहिताना स्वत:चे विचार, स्वत:च्या कल्पना स्वभाषेत लिहाव्यात, अशी अपेक्षा आहे. या कृतींची उत्तरे मुक्तोत्तरी स्वरूपाची असतात. विद्यार्थ्यांनी ही उत्तरे स्वत: लिहावीत.

या विषयातील सोडवून दिलेल्या पहिल्या कृतिपत्रिकेतील उपयोजित लेखनामधील कृतींची उत्तरे विद्यार्थ्यांनी अभ्यासावीत; गुणदान-पद्धतीतील मुद्दे विचारात घ्यावेत आणि स्वत: लिहिलेले उत्तर स्वत:च तपासण्याचा प्रयत्न करावा. गरजेनुसार आपल्या शिक्षकांचे मार्गदर्शनही घ्यावे.

***उपयोजित लेखनाच्या अधिक अभ्यासासाठी***

***'नवनीत मराठी (LL) उपयोजित लेखन : इयत्ता दहावी'***

***या पुस्तकात दिलेले उपयोजित लेखनाचे नमुने अवश्य वाचावेत.***